# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.09.2024** **वारःगुरुवार**

---

1.राज्य शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

2.महिलेवरील अत्याचारासाठी फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांचा दयेचा अर्ज नाकारण्यात यावा, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांची राष्ट्रपतींना विनंती

3.राज्याला केंद्रिय कृषी मंत्रालयाचा कृषी पायाभूत निधी सर्वोत्कृष्टता पुरस्कार

4.विदर्भ मराठवाड्यातल्या अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचं आश्वासन आणि

5.पॅरीस पॅरालिम्पिक्समध्ये सांगलीच्या सचिन खिलारीला गोळाफेकीत रौप्यपदक

**<u>राष्ट्रपती</u>**

महिला शिक्षित झाली, तर संपूर्ण कुटुंब, भावी पिढी शिक्षित होते आणि हेच समीकरण सक्षमीकरणासाठी देखील लागू होतं असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. लातूर जिल्ह्यात उदगीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या काल बोलत होत्या. महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष द्यावं असं आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

राज्य शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढं ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपतींनी राज्यातल्या महिला विकासाच्या योजनांचं कौतुक केलं.

या कार्यक्रमाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

महिला सशक्त झाल्या, तरच आपल्या देशाचा विकास होईल, असं मत रामदास आठवले यांनी व्यक्त केलं. तर मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारच्या महिला आणि शेतकऱ्यांसाठीच्या योजनांची माहिती दिली. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना निधीवाटप करण्यात आलं.

तत्पूर्वी राष्ट्रपतींच्या हस्ते तळवेस परिसरात बांधलेल्या विश्वशांती बुद्ध विहाराचं लोकार्पण करण्यात आलं. या बुद्ध विहारात बाराशे अनुयायांसाठी बैठक व्यवस्था असलेलं ध्यान मंदिर असून विहाराच्या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधल्या सांची स्तूपासारखी आहे.

उदगीर इथल्या कार्यक्रमानंतर राष्ट्रपतींनी नांदेड इथं श्री सचखंड हुजुरसाहिब गुरुद्वाराला भेट दिली. यावेळी त्यांनी गुरुद्वारातील लंगरलाही भेट देऊन पाहणी केली.

**<u>नीलम गोऱ्हे</u>**

महिला आणि अल्पवयीन मुलींसंदर्भातल्या गुन्ह्यांसाठी ज्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा सुनावली आहे, असे गुन्हेगार अनेकदा दयेचा अर्ज करतात. त्यांचा दयेचा अर्ज नाकारण्यात यावा, अशी विनंती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना केली आहे. डॉक्टर गोऱ्हे यांनी काल मुंबईत राष्ट्रपतींची भेट घेऊन त्यांना याबाबतचं निवेदन सादर केलं. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर आरोपींकडून आलेले दयेचे अर्ज अनेकदा प्रलंबित राहतात आणि त्यामुळे आरोपीला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतरही त्याची अंमलबजावणी करता येत नाही. तसंच अशा खटल्यांच्या निकालाला लागणारा वेळ कमी करण्यासाठी कमिशनर ऑफ विमेन राइट्स म्हणजेच महिलांच्या संदर्भातले आयुक्त हे विधी आणि न्याय विभागाचे नेमावेत, असं या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>एआयएफ पुरस्कार</u>**

केंद्रिय कृषी मंत्रालयाच्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत देण्यात येणारा यंदाचा कृषी पायाभूत निधी सर्वोत्कृष्टता पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला आहे. तसंच 2022-23 या वर्षासाठी राज्याला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नवी दिल्लीत काल झालेल्या समारंभात केंद्रिय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत दिलेल्या कर्जावर वार्षिक 3 टक्के सवलत दिली जाते. या योजनेसाठी राज्यात गेल्या ऑगस्ट महिन्यापर्यंत विविध बँकांनी 8 हजार 3 शे 53 प्रकल्पांसाठी 6 हजार 1 शे 17 कोटी रुपयांचं कर्ज मंजूर केलं आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगानं सर्व राज्यांमधल्या कृषी पायाभूत सुविधा निधीचा लाभ घेतलेल्या प्रकल्पांमधल्या उत्पादनांची दालनं उभारण्यात आली होती. यात राज्यातून रायगड जिल्ह्यातल्या पूजा वायचळ यांच्या फलोत्पादनांच्या स्टॉलचा समावेश होता.

**शिक्षक दिन**

माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस, 5 सप्टेंबर, देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशभरातल्या 82 शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळालेल्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातले कलाशिक्षक सागर बगाडे आणि गडचिरोली जिल्ह्यातले मंतैय्या बेडके यांचा समावेश आहे.

**एसटी**

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना एप्रिल 2020 पासून मुळ वेतनामध्ये 6500 रुपयांची वाढ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईतील बैठक केल्यानंतर या कर्मचाऱ्यांचा संप मागं घेण्यात आला आहे. या निर्णयाचं एसटी कर्मचारी कृती संघटनेनं स्वागत करुन मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. ऐन गणपती उत्सवाच्या काळात एसटी संपामुळं सामान्य लोकांना झालेल्या त्रासाबद्दल मुख्यमंत्र्यांनी संघटनांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

अन्य एका बैठकीत, राज्य शासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, युनिफाईड निवृत्ती योजनेसह सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एका पर्यायाची निवड करता येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिकारी- कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींना काल सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयावर विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी सहमती दर्शवत आपला प्रस्तावित संप स्थगित करण्याची घोषणा केली. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या योजनांचा अभ्यास करुन त्यांच्या दृष्टीनं लाभदायक योजनेची निवड करता येणार आहे.

**पूररेषा बांधकाम**

पूररेषा भागात कुठल्याही स्वरुपाचं बांधकाम केल्याचं आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय चंद्रपूर महापालिकेनं घेतला आहे. या ठिकाणी बांधकाम करण्याची तयारी सुरू असल्याचं दिसल्यास संबंधित बांधकाम साहित्य जप्त करण्यात येणार असून सुरु असलेलं बांधकाम पाडण्यात येणार आहे. महापालिकेनं यासाठी विशेष निगराणी पथक नेमलं असून या पथकाकडून सदर परिसराची रोज पाहणी केली जाणार आहे. आवश्यकता भासल्यास पाहणीसाठी ड्रोनचा वापर केला जाणार आहे.

**पाऊस नुकसान पाहणी**

राज्यात विदर्भ आणि मराठवाड्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळं शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर जिल्ह्यातल्या उदगीर तालुक्यात अतीवृष्टीमुळं झालेल्या नुकसानाची पाहणी केली. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई देण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं तर वेगानं नुकसानाचे पंचनामे करुन लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलं.

कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड आणि परभणी जिल्ह्यात शेतपिकांच्या नुकसानाची पाहणी केली. ६५ मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस म्हणजेच अतीवृष्टी झाली असेल त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचमाने करण्याची गरज नाही, त्यांना अतिवृष्टी झाल्याच्या नियमानुसार आर्थिक मदत मिळेल, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

लातूर जिल्ह्यात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी चाकूर आणि घरणी इथं शेतीच्या नुकसानीची पाहणी केली. एकही शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

धाराशिव जिल्ह्यात सुमारे ६ हजार ६७ हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं आणि फळबागांचं नुकसान झालं आहे.

भंडारा जिल्ह्यात पावसामुळं बागायती शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. कृषी विभागानं पंचनामे करुन आर्थिक मदत द्यावी अशी मागणी जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी केली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात सुमारे ११ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान झालं आहे तर ४८ हेक्टरवरची जमीन खरडून गेली आहे.

हिंगोली जिल्ह्यातही विभागीय आयुक्तांनी नुकसानाची पाहणी करुन जलद गतीनं मदत देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

**पाणीसाठा-पीटीसी-सुरेखा**

सातारा जिल्ह्यातलं कोयना धरण काल सकाळी पूर्ण क्षमतेनं भरलं असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून अद्याप पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे १ फूट उघडून कोयना नदीत पाण्याचा विसर्ग केला जात आहे.

धुळे शहराला पाणीपुरवठा करणारा नकाणे तलावही शंभर टक्के भरला आहे. हरणमाळ, डेडरगांव तलावही पूर्ण भरले आहेत.

**<u>हॉकी</u>**

वरीष्ठ पुरुष गटासाठीची चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून पुण्यात सुरू होत आहे. या स्पर्धेत देशभरातले 18 संघ सहभागी होणार आहेत. टोक्यो ऑलिम्पिक खेळलेले सुरेंदर कुमार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आकाशदीप तसंच ऑलिम्पियन धरमवीर आणि दिलप्रीत सिंग यांच्यासह अनेक नामवंत खेळाडू यात सहभागी होणार आहेत.

**<u>पॅरालिम्पिक्स-पूल-सुरेखा</u>**

पॅरीस इथं सुरू असलेल्या पॅरालिम्पिक्स स्पर्धेत काल भारताच्या सचिन खिलारी यानं गोळाफेक प्रकारात रौप्य पदक पटकावलं. महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातल्या सचिननं अंतिम फेरीत १६ पूर्णांक ३२ शतांश मीटर गोळाफेक करुन पदक मिळवलं.

भारतीय खेळाडूंनी काल दोन सुवर्णांसह चार पदकं जिंकली. हरविंदर सिंगनं तिरंदाजीत पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह खुल्या स्पर्धेत सुवर्ण पदकासह इतिहास रचला.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.